| **Headline:** Shareholders give nod to Vikram Limaye's appointment at NSE | |
| --- | --- |
| **Source:** Loksatta | **Date:** 8 March 2017 |

# विक्रम लिमये यांच्या नियुक्तीला 'एनएसई' भागधारकांची मंजुरी

**व्यापार प्रतिनिधी, मुंबई**

**देशातील सर्वात** मोठा भांडवली बाजार असलेल्या राष्ट्रीय शेअर बाजाराच्या (एनएसई) व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारीपदी विक्रम लिमये यांच्या नियुक्तीला मंगळवारी कंपनीच्या भागधारकांनी मंजुरी दिली. बाजाराची अतिरिक्त सर्वसाधारण सभा मुंबईत झाली. त्यात लिमये यांच्या पाच वर्षे मुदतीच्या नियुक्तीला मंजुरी देण्यात आली. आयडीएफसी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी असलेल्या लिमये यांची राष्ट्रीय शेअर बाजाराचे नवे मुख्य कार्यकारी अधिकारीपदावरील नियुक्ती गेल्या महिन्यात जाहीर झाली होती.